क्रमांक: एलपीएस-२०१६/सीआर-३५/२०१६/तीन    दिनांक :- १० ऑगस्ट, २०१६

# घोषणा

**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१६ प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

शासन परिपत्रक, गृह विभाग क्रमांक:- पीएसबी-०३१४/प्र.क्र.३५३/पोल-५अ, दिनांक २७ जून, २०१६ नुसार आयोगामार्फत रविवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ रोजी आयोजित पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१६ करीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mahampsc.mahaonline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रवेशप्रमाणपत्राची प्रत उमेदवारांनी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.** प्रवेशप्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ४००००१ येथील कार्यालयात व्यक्तीश: संपर्क साधावा. यासंदर्भात उमेदवाराला ०२२ - ६७०७७०७६, ६७०७७०७७, ६७०७७०८१, ६७०७७०८२ या दूरध्वनी क्रमांकावरुन आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**३.** परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी परीक्षा झाल्यावर आयोगाशी संपर्क साधल्यास परीक्षेसाठी उमेदवारीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**४.** परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**५.**परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैंकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

ठिकाण: मुंबई

सु. ह. अवताडे<br>
अवर सचिव<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.